18

Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

**Editor in Chief**

**Mr.Arun B. Godam**

www.publishjournal.co.in

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue XIX (19) , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
August 2018 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# Index

**1.** Digital Banking :An Overview 5
Dr Madhukar P Aghav

**2.** Financial Markets : Evaluating Averages and Indicators 13
Dr Sachin Nagnath Hadoltikar
Memon Sohel Mohd Yusuf

**3.** Human Resource Management (Hrm) :An Overview 19
Dr. Kathar Ganesh. N.

**4.** Impact of Mergers & Acquisition on Private Sector Banks In Global Economy 26
Dr. Nanaji Krishna Aher

**5.** Dramatic Stress: The Spirit of Play 32
Sheema Farheen
Dr Farhat Durrani

**6.** Recent Trend InBanking 41
Swapnil .Kalyan. Laghane, Dr Quazi Baseer Ahmed

**7.** Corporate Governance in Maharashtra Companies 49
Dr. Rajesh Bhausaheb Lahane

**8.** Effective Digital Marketing Strategies & Approaches 59
Dr Vikrant Uttamrao Panchal

**9.** Global Competitiveness of Indian Industries Strategy and Innovation 70
Dr. Rajendra Ashokrao Udhan

**10.** Indian logistics Trade in Dynamic World Scenario 79
Adnan Ali Zaidi, Dr Memon Ubed

**11.** Demonetization: Before And After Menkudle D.V 95
Dr. Shahuraj S. Mule

**12.** ब्रिटीशांचे मतदार विषयक कायदे आणिडॉ. बाबासाहेब आंबेडकर 9
प्रा डॉ. अनिल सिंगारे

**13.** महिला सक्षमीकरणात बचत गटाची भूमिका 107
डॉ.एस.पी. गायकवाड

**14.** नई बिसात : उपन्यास में दलित चित्रांकण 111
डॉ. बालाजी कोनाळे

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Issue XIX (19) , Vol. I<br>August 2018 | Peer Reviewed<br>SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# महिला सक्षमीकरणात बचत गटाची भूमिका

**डॉ.एस.पी. गायकवाड**
प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय,लातूर

---

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांच्या सक्षमीकरणासाठी महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, सावित्रीबाई फुले अशा समाजसुधारकांनी मुलींना शिक्षणासाठी शाळा सुरू करून महिलांच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. त्यात बचत गटाच्या चळवळीने स्त्री सक्षमीकरणात फार मोलाचे सहकार्य केले आहे. गेल्या पंचवीस वर्षांत सबलीकरणावर भर देऊन पुरुष व स्त्रिया यांच्यात सर्व बाबतीत समानता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्वयंसहाय्यता समूह चळवळ जोमाने सुरू आहे. खऱ्या अर्थाने ग्रामीण भागात जिथे महिलांचे दारिद्र्य महिलाविषयक वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरा रुढी, चालीरीती यामुळे महिलांची स्थिती खालावलेली आहे. तसेच असंघटितपणा, शिक्षणाचा अभाव, रोजगार व आरोग्य यांच्या अभावामुळे दारिद्र्य वाढलेले आहे. या सर्व समस्यांविरुद्ध लढण्यासाठी महिलांच्या दृष्टीने संघटीत होऊन परिणामकारक काम करण्याचे महत्त्वाचे शस्त्र म्हणजे स्वयंसहाय्यता गट होय. स्वयंसहाय्यता गट ही चळवळ आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी असली तरी महिलांच्या वैयक्तिक, सामाजिक, आरोग्यदृष्ट्या प्रश्नांची सोडवणूक देखील या गटांच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे महिलांचे सबलीकरण स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होण्यास हातभार लागत आहे.

सर्वसाधारण १५-२० लोकांचा किंवा महिलांचा औपचारिक समूह म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट असतो. यात निश्चित स्वरूपाचे उद्दिष्ट घेऊन स्वइच्छेने एकत्र आलेल्या लोकांचा किंवा महिलांचा समूह असतो. यात एकाच कारणासाठी गटातील लोकांच्या उन्नती, विकास व फायद्यासाठी बचत गटातील समूह हे एकत्र आलेले असतात. बचत गटातील प्रत्येक सभासद समान रक्कम ठराविक कालावधीत बचत म्हणून एकत्र करतात व त्याचा उपयोग सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी लोकशाही मार्गाने केला जातो. बचत गट ही कोणती योजना किंवा प्रकल्प नसून महिलांना व युवकांना संघटीत करण्यासाठी त्यांना विकासात्मक स्वरूपाचे शिक्षण देण्यासाठीचे माध्यम आहे.

स्वयंसहाय्यता गटाची चळवळ जगभर वेगवेगळ्या संकल्पनेतून साकार होत असली तरी सर्व संकल्पनेच्या मुळाशी महिला सक्षमीकरण म्हणून ही चळवळ फोफावत आहे. सन १९७० च्या दशकाच्या शेवटी बांग्लादेशातील चितगाव विद्यापीठातील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक व बांग्लादेश ग्रामीण बँकेचे प्रणेते डॉ.महंमद युनूस यांच्यामुळे सुरू झाली. त्यांच्या प्रेरणेतून जगभर विशेषत: विकसनशील देशात ही चळवळ फोफावत आहे. बचत ही संकल्पना नवीन नाही. जगात फंड भिशी अशा विविध स्वरूपात बचतीचे काम चालूच होते. भारतात स्वयंसहाय्यता गटाची चळवळ 'म्हैसूर सेटलमेंट अँड डेव्हलपमेंट एजन्सी (मायराडा) या संस्थेने सुरू केली. त्यांनी Credit Management Group निर्माण केले. मायराडाच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गटांची निर्मिती होत असताना १९८० च्या दशकात नाबार्डने स्वयंसहाय्यता गटाचे मॉडेल स्वीकारून ग्रामीण भागात प्रयोग सुरू केले. सन १९९१-९२ मध्ये नाबार्ड गटांना वित्तीय क्षेत्रात कायदेशीर मान्यता देऊन बचत गटांच्या चळवळीचा प्रारंभ झाला आणि या चळवळीत वरचेवर महिलांचा सहभाग वाढत गेल्याने बचत गट चळवळीचे संदर्भही बदलले. आज जरी आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, केरळ या राज्यातील बचत गटाच्या कार्याचा उल्लेख केला जात असला तरी महाराष्ट्रात ही संकल्पना १९४७ मध्येच वेगळ्या स्वरूपात अस्तित्वात होती. भारतात सन १९४७ मध्ये अमरावती जिल्ह्यात काही सासुरवासुनांनी एकत्र येऊन फक्त २५ पैसे बचतीस प्रारंभ केला. १९७० पासून बचत गटाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. सन १९९३ मध्ये महाराष्ट्र शासनाने महिला आयोग जाहीर करून महिला स्वयंसहाय्यता गट चळवळीला प्राधान्यक्रम दिल्याने जिल्ह्याच्या सर्व कानाकोपऱ्यात पसरली. भारतात बचत गटाला यश मिळविण्यामध्ये स्वयंसेवी संस्थांचे फार मोठे योगदान आहे. सधन, धन फाऊंडेशन, सासा यासारख्या दक्षिणेकडील स्वयंसहायता बचत गटाचे काम करतात. भारतामध्ये १९९८-९९ च्या अंदाजपत्रकात स्वयंसहाय्यता गटावर भर देऊन तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच विद्यापीठ पातळीवर बचत गटाच्या अभ्यासाला मान्यता देऊन अभ्यासक्रमही सुरू करण्यात आले आहेत. भारतात मिनी सहकार म्हणून बचत गट मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहेत.

| Issue XIX (19) , Vol. I<br>August 2018 | Peer Reviewed<br>SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

संदर्भ
१) महिला सबलीकरण, रमाई संभाजी,महिला सबलीकरण, प्रशांत पब्लिकेशन
२) मुलाणी एम.यु., महिला स्वयंसहायता बचत गट, डायमंड पब्लिकेशन्स
३) mr.vikaspedia.in स्वयंसहायता गट
४) लोकसत्ता - महिला बचत गट बिनव्याजी कर्ज, फेब्रुवारी २२, २०१६
५) प्रहार - महिला बचत गट, एक संधी
६) www.thinkermaharashtra.com महिलांचे भावविश्व उलगडणारे बचत गट, ०१-०१-२०१८
७) लोकसत्ता - महिला बचत गट कसा स्थापन कराल?, १६ नोव्हेंबर २०१६

Current Global Reviewer


ISSN 2319-8648

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

Peer Reviwed Journal



Edited By
Shaurya Publication
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION

Publisher
Shaurya Publication

www.publishjournal.co.in